# तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी औरंगाबाद

Email-tahsildarabad@gmail. Phone no.02402334728

अतितात्काळ-कोरोना कोविड 19 प्राधान्य

जा.क्र.2021/आपती व्य./कोव्हीड-19/कावि-
दिनांक 10/03/2021

वाचा:- 1. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 खंड 2, 3 व 4.
2. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005.
3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई 32 यांची दिनांक 13 मार्च 2020 ची अधिसूचना.
4. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. करोना 2020/प्र.क्र.58/आरोग्य-5 दिनांक 14 मार्च 2020.
5. मा. जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण औरंगाबाद यांचे आदेश जा. क्र. 2021/जिआव्य/जि.नि.कक्ष/कावि- दिनांक 07/03/2021 व 10/03/2021

## :: आदेश ::

ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना (कोव्हीड-19) या विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषीत केलेला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रातील शहरात गतीने पसरत असल्याचे दिसून येत आहे. तसेच राज्य शासनाने कोरोना विषाणुचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन, सदर कायद्यातील खंड 2, 3 व 4 मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमीत केलेली आहे.

ज्याअर्थी, मी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, औरंगाबाद मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन कोव्हिड केअर सेंटर (Covid Care Center) करिता खाजगी शिवा ट्रस्ट गुप ऑफ इंन्सटयुशन औरंगाबाद संचलित, यंशवतराव चव्हाण आयुर्वेद मेडिकल कॉलेज व हॉस्पीटल तसेच शरदचंद्रजी पवार पॉलीटेक्नीक कॉलेज मौंजे निपाणी-भालगाव ता. जि. औरंगाबाद या दोन्ही कॉलेजच्या इमारती व यातील सर्व कार्यालयीन कर्मचारी / सफाई कामगार / इलेक्ट्रीशीयन / पाणी पुरवठा कर्मचारी / माळी कामगार / सर्व इमारतीचा परिसर तसेच इमारतीतील सर्व फर्निचरसह अधिग्रहीत करण्यात आले होते.

त्याप्रमाणेच आता पुन्हा कोरोना विषाणुचा संसर्ग वाढत असल्याने या आदेशान्वये उक्तप्रमाणे नमूद केल्यानूसार शिवा ट्रस्ट गुप ऑफ इंन्सटयुशन औरंगाबाद संचलित, यंशवतराव चव्हाण आयुर्वेद मेडिकल कॉलेज व हॉस्पीटल तसेच शरदचंद्रजी पवार पॉलीटेक्नीक कॉलेज मौजे निपाणी-भालगाव ता. जि. औरंगावाद या दोन्ही कॉलेजच्या इमारती सर्व सोईसुविधेसह शासनाच्या पुढील आदेशापर्यंत अधिग्रहीत करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

| अ.क्र. | खाजगी हॉस्पीटलचे (इमारतीचे) नाव | शेरा |
| --- | --- | --- |
| 1 | शिवा ट्रस्ट गुप ऑफ इंन्सटयुशन औरंगाबाद यंशवतराव चव्हाण आयुर्वेद मेडिकल कॉलेज व हॉस्पीटल व शरदचंद्रजी पवार पॉलीटेक्नीक कॉलेज मौजे निपाणी-भालगाव ता. जि. औरंगाबाद. | प्राचार्य डॉ. भैरव कुलकर्णी संपर्क क्र. 9967282076 |

सदरील आदेश व अधिसुचनेची अवहेलना करणारी कोणतीही व्यक्ती संस्था अथवा हॉस्पीटल चे मालक, संघटना ही भारतीय दंडसंहिता (45 ऑफ 1860) 60 च्या कलम 188 तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 51 बी, 55, 56 नुसार दंडनीय कायदेशीर कारवाईस पात्र राहील याची नोंद घ्यावी.

सही/-
इन्सिडेंट कमांडर तथा

तहसिलदार औरंगाबाद

**:: प्रतिलिपी ::**

१. मा. जिल्हाधिकारी, कार्यालय औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. पोलीस अधिक्षक (ग्रामीण), औरंगाबाद यांना माहिती व यथोचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.
३. मा. उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. तालुका आरोग्य अधिकारी, ता. जि. औरंगाबाद यांना देवून कळविण्यात येते की, सदरील रुग्णालय तात्काळ आपल्या ताब्यात घेवून कोरोना रोगाच्या दृष्टीकोनातून ISOLATION च्या आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात.
५. गट विकास अधिकारी, पंचायत समिती औरंगाबाद यांना देवून कळविण्यात येते की, Covid Care Center येथे पाण्याची व सदरील Covid Care Center मध्ये निर्जतुकीकरण करण्यासाठी कर्मचा-यांची नियुक्ती करुन याकामी आपले स्तरावरून आवश्यक ते मनुष्यबळ पुरविण्यात यावे. व वेळोवेळी Covid Care Center ला भेट देऊन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा
६. नोडल अधिकारी तथा नायब तहसिलदार, (महसुल-1) तहसिल कार्यालय, औरंगाबाद यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
७. सहा. पोलीस निरीक्षक, चिकलठाणा ता. जि. औरंगाबाद यांना देवून कळविण्यात येते की, शिवा ट्रस्ट गुप ऑफ इंन्सटयुशन औरंगाबाद संचलित यंशवतराव चव्हाण अयुवेद मेडिकल कॉलेज व हॉस्पीटल व शरदचंद्रजी पवार पॉलीटेक्रीक कॉलेज मौजे निपाणी-भालगाव ता. जि. औरंगाबाद येथे कोव्हिड केअर सेंन्टर (Covid Care Center) उभारण्यात आले असुन सदरील ठिकाणी तात्काळ योग्य तो पोलीस बंदोबस्त पुरविण्यात यावा..
८. मंडळ अधिकारी, चिकलठाणा / तलाठी सजा, झाल्टा / भालगांव यांना देवून सूचित करण्यात येते की, सदरील Covid Care Center मध्ये आवश्यक साहित्य व सुविधा उपलब्ध करून घेणेबाबत कार्यवाही करावी.
९. व्यवस्थापक, शिवा ट्रस्ट भालगांव - निपाणी ता. जि. औरंगाबाद यांना तात्काळ अनुपालनास्तव.

इन्सिडेंट कमांडर तथा
तहसिलदार औरंगाबाद

Scanned with CamScanner